# प्रस्तावना

सार्वजनिक बांधकाम विभाग आणि महाउर्जा यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रीन बिल्डिंग आणि एनर्जी कन्झर्व्हेशन बिल्डिंग कोड (ECBC) या विषयावर दिनांक २९/०८/२०१६ रोजी सार्वजनिक बांधकाम विभागातील शाखा अभियंता स्तरापर्यंतच्या अधिका-यांसाठी एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

राज्य शासनाने ग्रीन बिल्डिंग बांधकामास प्रोत्साहन देण्यासाठी दिनांक ०८/०७/२०१६ रोजी शासन निर्णय पारित केला आहे. यामध्ये महाराष्ट्र शासनाच्या अधिपत्याखालील सर्व इमारतींचे " हरित इमारत संकल्पना" वर आधारित नकाशे व आराखडे तयार करण्यात यावेत, तसेच अस्तित्वातील महत्वाच्या इमारतींची दुरुस्ती हाती घेण्यात येणा-या कामांमध्येही हरित इमारत संकल्पनेचा उपयोग लक्षात घेऊनच दुरुस्ती विषयक उपाययोजना करण्यात यावेत अशा सुचना देण्यात आलेल्या आहेत. नविन इमारतींचे बांधकाम करताना पर्यावरणांचे संतुलन राखणे तसेच नैसर्गिक ऊर्जा स्त्रोतांचा वापर इमारतींच्या प्रकल्पामध्ये समावेश करणेबाबत नियोजन करण्यात येणार आहे. तसेच ग्रीन बिल्डींग बांधकामानंतर त्या इमारतींचे परीक्षण हे LEED, GRIHA, IGBC यांच्यासारख्या मान्यताप्राप्त संस्थाकडून करण्यात येणार आहे.

तसेच ब्युरो ऑफ एनर्जी एफिशिअन्सी, भारत सरकार यांनी व्यावसायिक इमारतींसाठी एनर्जी कन्झर्व्हेशन बिल्डींग कोड तयार केले आहेत. ऊर्जा संवर्धन कायदा २००१ मधिल तरतुदींनुसार १०० किलो वॅट व अधिक विद्युत भार असणा-या वाणिज्य इमारतींना सदर कोड बंधनकारक करण्यात येणार आहे. या कार्यशाळेमध्ये एनर्जी कन्झर्व्हेशन बिल्डिंग कोड (ECBC) याविषयी सादरीकरण करण्यात आले.

या कार्यशाळेचे उद्घाटन महाऊर्जाचे संचालक, मा. श्री. नितीन गद्रे व सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव (इमारती) श्री. चंद्रशेखर जोशी यांचे हस्ते झाले. श्री. पी. एम. किडे, मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, पुणे, यांनी मार्गदर्शन केले.

या कार्यशाळेमध्ये ग्रीन बिल्डिंग, इ.सी.बी.सी. तसेच ग्रीन बिल्डींग रेटींग सिस्टीम याविषयी ग्रीन बिल्डिंग क्षेत्रातील तज्ञ व्यक्ती, आर्किटेक्ट पूर्वा केसकर, नम्रता रणदिवे, अपूर्व वीज, श्रेयासी अनसिंगकर, अनशुल गुजराथी, कांचन सिध्दये, अंकूर कुलकर्णी यांनी सादरीकरणाच्या माध्यमातून मार्गदर्शन केले.

श्री. शेवटी आर. एस. राहाणे, अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ , पुणे यांनी आभार मानले.